नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ३७ Issue - 37 | वार - बुधवार दि. १ जुलै २०२६ Blow- Wednesday Date 1 JULLY 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## राष्ट्रीय आरोग्य अभियानातील १५,०१० कंत्राटी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा

### १० वर्षांहून अधिक सेवा असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी अधिसंख्य पदे निर्माण करण्याचा शासन निर्णय जारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : राष्ट्रीय आरोग्य अभियान (एनएचएम) अंतर्गत राज्यभर कार्यरत असलेल्या १० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक सेवा पूर्ण केलेल्या १५ हजार १० कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा समायोजनाचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. या कर्मचाऱ्यांसाठी समकक्ष वेतनश्रेणीतील अधिसंख्य पदे निर्माण करण्यास आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या वार्षिक १,१५३.६० कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता देणारा शासन निर्णय आज निर्गमित केला आहे. या निर्णयामुळे राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर तसेच राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या समायोजनासाठी विशेष पाठपुरावा केला असून त्यानुसार आज हा शासन निर्णय घेण्यात आला. यापूर्वी १४ मार्च २०२४ रोजी मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार १० वर्षांपेक्षा अधिक सेवा पूर्ण केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा समायोजनाचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर ४ नोव्हेंबर २०२५ रोजी या निर्णयात सुधारणा करण्यात आली. तसेच, या कर्मचाऱ्यांच्या समायोजनासाठी निकष निश्चित करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली आंतरविभागीय समितीची स्थापना करण्यात आली होती. या समितीच्या शिफारशी आणि २५ जून २०२६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयानुसार आजचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

शासन निर्णयानुसार, २५ जून २०२६ या मंत्रिमंडळ बैठकीच्या दिनांकापर्यंत तांत्रिक खंड वगळून सलग १० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक कंत्राटी सेवा पूर्ण केलेल्या १५,०१० कर्मचाऱ्यांना एकवेळच्या विशेष




बाब म्हणून समकक्ष वेतनश्रेणीतील अधिसंख्य पदांवर नियुक्ती देण्यात येणार आहे. यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग आणि ग्रामविकास विभागातील नियमित मंजूर पदांशी संबंधित कंत्राटी पदांची समकक्षता निश्चित करण्यात येणार असून, आवश्यकतेनुसार इतर विभागांतील समकक्ष पदांचाही विचार केला जाणार आहे.

पदांची समकक्षता निश्चित करताना संबंधित पदाचे कामाचे स्वरूप, जबाबदाऱ्या, शैक्षणिक पात्रता, सेवा प्रवेश नियम, सध्याचे मानधन आणि सातव्या वेतन आयोगानुसार लागू असलेली वेतनश्रेणी यांचा विचार केला जाईल. वित्त विभागाची आवश्यक मान्यता घेतल्यानंतर संबंधित विभागांकडून अधिसंख्य पदे निर्माण करून पात्र कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. या कर्मचाऱ्यांना समकक्ष पदाच्या वेतनश्रेणीतील किमान मूलभूत वेतन, महागाई भत्ता आणि प्रवास भत्ता देण्यात येईल. तसेच सध्या मिळत असलेले वेतन संरक्षित राहील. मात्र, या कर्मचाऱ्यांना पदोन्नती, आश्वासित प्रगती योजना, निवृत्तीवेतन अथवा कुटुंब निवृत्ती वेतनाचा लाभ मिळणार नाही. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सध्या लागू असलेल्या रजाच त्यांना लागू राहतील.

शासन निर्णयात अधिसंख्य पदे ही व्यक्तीसापेक्ष असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. संबंधित कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर, राजीनामा दिल्यानंतर किंवा अन्य कारणांनी सेवा संपुष्टात आल्यानंतर ती पदे आपोआप रद्द होतील आणि त्या पदांवर नवीन नियुक्ती करता येणार नाही. या कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्त्वावर नियुक्तीही मिळणार नाही.

यापुढे अशा प्रकारची नियमितीकरणाची प्रकरणे निर्माण होऊ नयेत म्हणून राष्ट्रीय आरोग्य अभियानातील मनुष्यबळाच्या सेवा भविष्यात प्रामुख्याने बाह्यस्त्रोत किंवा सेवा करार पद्धतीने घेण्याचेही शासनाने स्पष्ट केले आहे. तसेच, भविष्यातील पदनिर्मितीबाबतचे निर्णय वित्त विभागाच्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेनेच घेतले जाणार असल्याचे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

## शाळकरी मुलांच्या बसवर झाड कोसळलं, एका विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू, १० जण गंभीर जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबई आणि उपनगरात गेल्या काही तासांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागांत जनजीवन विस्कळीत झाले आहे. पावसाचा जोर इतका प्रचंड आहे की शहरात अनेक ठिकाणी झाड कोसळण्याच्या गंभीर घटना समोर येत आहेत. यातच मुंबईतील चेंबूर भागातून एक अत्यंत धक्कादायक आणि थरकाप उडवणारी मोठी दुर्घटना समोर आली आहे. चेंबूर येथील ११ नंबर रोडवर एका धावत्या शाळकरी मुलांच्या बसवर अचानक एक भलामोठा वृक्ष कोसळला. त्यामध्ये एका विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या भीषण अपघाताच्या वेळी बसमध्ये अनेक शाळकरी मुले उपस्थित होते. झाड कोसळल्यामुळे बसचा वरचा भाग पूर्णपणे चेपला गेला असून, या अत्यंत दुर्दैवी घटनेत एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाला तर तब्बल १० शाळकरी मुले गंभीररीत्या जखमी झाली आहेत. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून पालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. ही बस टिळकनगरमधील युनिव्हर्सल शाळेची असल्याची माहिती समोर आली आहे. घटना घडली त्या क्षणी परिसरात एकच खळबळ उडाली. स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, १० जखमी मुलांना बाहेर काढण्यात यश आले असले, तरीही एक शाळकरी मुलगा बसमध्येच अडकला होता. त्याला सुखरूप बाहेर काढण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करण्यात आले, मात्र दुर्दैवाने त्यामध्ये यश आलं नाही. एका विद्यार्थ्याचा यामध्ये मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आपत्ती व्यवस्थापन कर्मचारी, अग्निशमन दल आणि स्थानिक पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आहेत. बसवर कोसळलेले झाड अत्यंत वजनी आणि मोठे असल्यामुळे ते बाजूला करण्यासाठी प्रशासनाकडून तातडीने जेसीबी मशीन पाचारण करण्यात आलं. जेसीबी आणि अत्याधुनिक कटर्सच्या सहाय्याने बसवर कोसळलेला झाडाचा मोठा भाग कापून बाजूला करण्याचे काम सध्या युद्धपातळीवर करण्यात आलं. ही अत्यंत धक्कादायक आणि काळजाचा ठोका चुकवणारी घटना घडताच प्रशासनाने घटनास्थळी अनेक रुग्णवाहिका पाचारण केल्या आहेत. बसमधून बाहेर काढण्यात आलेल्या सर्व १० गंभीर जखमी मुलांना तातडीने उपचारासाठी जवळच्या पालिकेच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर डॉक्टरांचे पथक उपचार करत आहे.

## उबाठाचे सचिन अहिर शिंदे सेनेत दाखल



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : ठाकरेंच्या शिवसेनेतील आमदार आणि वरळी मतदारसंघातील नेते सचिन अहिर यांनी ठाकरेंची साथ सोडत एकनाथ शिंदेंसोबत जाण्याचा निर्णय घेतला. कारण, आज विधानपरिषद उपसभापतीपदासाठी सचिन अहिर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यानंतर, आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंना टोला लगावला. आमच्या सहा खासदारांच्या मतदारसंघात जाऊन आले, त्यांना शिव्यांची लाखोली वाहून आल्यानंतर मुंबईत त्यांच्या स्वागतासाठी सचिन अहिर आले आहेत, असे म्हणत एकनाथ शिंदेंनी टीका केली. एकनाथ शिंदे जे करतो ते फुलप्रूफ करतो, त्यामुळे काही अडचण नाही, मी काही खुलासा करणार नाही पण जे काही केले ते फुलप्रूफ आहे, असे म्हणत कायदेशीर पश्न उद्भवणार नसल्याचेच एकनाथ शिंदेंनी सचिन अहिर यांच्या पक्षप्रवेशानंतर म्हटले.

ग्रासरुटचा कार्यकर्ता म्हणून सचिन अहिर यांच्याकडे पहिले जाते, त्यांनी आज महायुतीतून उपसभापतीपदाचा फॉर्म भरला आहे, उद्या त्यांची प्रस्तावाच्या माध्यमातून निवड होईल. फक्त मुंबईच नाही तर उपसभापती म्हणून ते महाराष्ट्राचे काम करतील, ते असल्याने शिवसेनेची ताकद मुंबई कामगार क्षेत्रात वाढेल, असे एकनाथ शिंदे यांनी म्हटलं. आपल्या नेत्याने आपल्या पाठीशी उभे राहिले पाहिजे ही प्रत्येक कार्यकर्त्याची माफक अपेक्षा असते, आज विधानपरिषद आमदार गोकुळ गीतेदेखील सहयोगी पक्ष म्हणून सोबत आहेत, आम्ही तोडायला नाही जोडला आलो आहोत. पॉझिटीव्ह आणि प्रॅक्टिकल रहाणे ही आमची भूमिका आहे, असे एकनाथ शिंदेंनी म्हटले. शिवसेना हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे, मी मुख्यमंत्री असताना देखील कार्यकर्ता म्हणून काम केले, एक टीम म्हणून काम करण्यात सचिन अहिर यांचा हातखंडा आहे, मी त्यांचे मनापासून स्वागत करतो, शुभेच्छा देतो, असे एकनाथ शिंदेंनी म्हटले.

**बंगालच्या उपसागरात पुन्हा कमी दाबाचे क्षेत्र**

## ३ ते ७ जुलै दरम्यान महाराष्ट्रात मुसळधार पावसाची शक्यता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : राज्यातील बहुतांश भागात पावसाला सुरुवात झाली आहे. का भागात पेरणीच्या कामांना देखील वेग आल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. तर काही भागात आणखी चांगल्या पावसाची गरज आहे. अशातच हवामान विभागाचे शास्त्रज्ञ एस डी सानप यांनी पावसासंदर्भातील अंदाज वर्तवला आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ३ ते ७ जुलै दरम्यान महाराष्ट्रात सर्वदुर पावसाची शक्यता आहे. बंगालच्या उपसागरात पुन्हा कमी दाबाचे क्षेत्र तयार होत आहे. त्यामुळं पाऊस परतण्याची शक्यता आहे.

३ ते ७ जुलै दरम्यान महाराष्ट्रातील सागरी किनारपट्टीवर मुसळधार पाऊस पडेलच त्याचबरोबर विदर्भ आणि मराठवाड्यात देखील ऑरेंज अलर्ट असेल असी माहिती हवामान विभागाचे शास्त्रज्ञ एस डी सानप यांनी दिली आहे. यावर्षी एल निनोमुळे पाऊस कमी आहे. हे आधीच सांगितले



आहे. मॉन्सुनचे वारे कमकुवत आहेत. एल निनोचा परिणाम पुढील वर्षी देखील जाणवणार असला तरी पुढील वर्षीच्या पावसाचा अंदाज आता सांगता येणार नाह अशी माहिती हवामान विभागाचे शास्त्रज्ञ एस डी सानप यांनी दिली.

रायगड जिल्ह्याला पुढील पाच दिवस पावसाचा ऑरेंज लर्ट देण्यात आला आहे. तसेच रायगडच्या दक्षिण भागात पावसाने हजेरी लावत शेतकऱ्याला दिलासा दिला आहे. रायगड मध्ये २३ जूनला सुरू झालेल्या पावसाने दोन दिवस दडी मारली होती. मात्र, कालपासून पुन्हा पाऊस बरसू लागल्याने शेतकऱ्याला मोठा दिलासा मिळाला आहे. पावसाचा जोर कायम राहिल्यास पुढील दिवसात शेतीची लावणी सुरू होण्याची शक्यता आहे. रायगड मधील अनेक नद्यांच्या पाणीपातळी मध्ये देखील हळूहळू वाढ होत असून पाण्याची चिंता मिटली आहे. हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यात जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. मुसळधार पावसामुळे हयातनगर, लिंगी, पळशीसह परिसरातील शिवार जलमय झाले असून अनेक शेतांमध्ये पाणी साचले आहे. जोरदार पावसामुळे लहान-मोठे ओढेही दुथडी भरून वाहू लागले आहेत. पेरणीसाठी आवश्यक असलेला हा पहिला समाधानकारक पाऊस असल्याने शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे.



संपादकीय....

## मुदतवाढ संपली

राज्यातील जुन्या वाहनांवर 'हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट' (एचएसआरपी) बसवण्यासाठी देण्यात आलेली अंतिम मुदत आज, ३० जून रोजी संपली. आता विनानंबर प्लेट धावणाऱ्या वाहनांवर परिवहन विभागाकडून कठोर कारवाई केली जाणार आहे. वाहनधारकांना पुरेसा वेळ मिळावा म्हणून आतापर्यंत पाच वेळा मुदतवाढ देण्यात आली आहे. मात्र, आता कोणतीही मुदतवाढ मिळणार नाही. ज्या वाहनांवर 'एचएसआरपी' नंबर प्लेट नसेल, त्यांच्यावर आरटीओ आणि वाहतूक पोलिसांकडून मोटर वाहन कायद्यानुसार १ हजार रुपयांचा दंड आकारला जाईल. दरम्यान, राज्यात अद्याप जवळपास ५१ टक्क्यांहून अधिक वाहनांवर ही नंबर प्लेट प्रत्यक्ष बसवण्याचे काम अपूर्ण असल्याने उद्यापासून वाहनधारकांना मोठा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार आहे. परिवहन विभागाने दिलेल्या आकडेवारीनुसार, 'एचएसआरपी' अंमलबजावणीत महाराष्ट्र देशात आघाडीवर आहे. राज्यातील सन २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या एकूण २ कोटी १० लाख २७ हजार ७१८ जुन्या वाहनांपैकी १ कोटी ८ लाख २८ हजार ७९९ वाहनधारकांनी (५१.५०%) या नंबर प्लेटसाठी ऑनलाइन नोंदणी केली आहे. मात्र, त्यापैकी प्रत्यक्षात केवळ ९५ लाख ९२ हजार ३०१ वाहनांवर (जवळपास ४९ टक्के सक्रिय वाहने) 'एचएसआरपी' नंबर प्लेट प्रत्यक्ष बसवण्याचे काम पूर्ण झाले आहे. अद्यापही निम्म्याहून अधिक वाहनांवर ही सुरक्षित नंबर प्लेट बसवणे बाकी आहे. सर्वसामान्यांच्या वाहनांची प्रक्रिया संथ गतीने सुरू असली, तरी सरकारी आणि निमशासकीय वाहनांच्या बाबतीत परिवहन विभागाने बाजी मारली आहे. राज्यातील एकूण ४७ हजार २३३ सरकारी वाहनांपैकी मे २०२६ अखेर तब्बल ४७ हजार ६७ वाहनांवर 'एचएसआरपी' नंबर प्लेट यशस्वीरीत्या बसवण्यात आली आहे. शासकीय पातळीवर या मोहिमेची जवळपास १०० टक्के अंमलबजावणी पूर्ण झाली असून, आता खासगी वाहनांवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

## स्वर्गीय अजित दादा पवार यांच्या पाचव्या मासिका निमित्त गरजू मुलींना सायकल व बाह्यांचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित दादा पवार हे कार्यकर्त्यांना बळ देणारे नेते होते. कार्यकर्त्यांना नेहमी सहकार्य करून कार्यकर्त्यातून नेता घडवणारे नेतृत्व म्हणून अजित दादा कडे पाहिले जाते. अजित दादांना जाऊन पाच महिने पूर्ण झाले आहेत. तिच्या पाचव्या मासिका निमित्त राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस श्रीकांत शिंदे यांच्या वतीने एक सामाजिक बांधिलकी जपत गरीब गरजू मुलींना सायकली व एक हजार रुपयांची वाटप व नगरपालिकेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्या हस्ते व युवा नेते प्रणव परिचारक यांच्या प्रमुख उपस्थितीत यशवंत विद्यालय पंढरपूर येथे करण्यात आले. यावेळी संजय बनपट्टे निखिल परचंडे, गणेश भाऊ आदरराव विजय अभंगराव दत्ता भोसले, राष्ट्रवादी शहराध्यक्ष मोहम्मद वस्ताद दिलीप कोरके, अमोल परबतराव, सारंग महामुनी, युवराज मुसलंबी संदीप तांदळे, पंकज पवार विकी अभंगराव, ऋषिकेश रायबान यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

मुख्याधिकारी महेश रोकडे म्हणाले की अजित दादा जाण्याने राज्याची खूप मोठी नुकसान झाले आहे. ती कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. व त्यांची पुढील सामाजिक कार्य जिवंत ठेवणे हीच त्यांना श्रद्धांजली आहे. असे विचार त्यांनी व्यक्त केले.

युवा नेते प्रणव परिचारक यांनी अजित दादांच्या आठवणींना उजाळा तुझ्या आधीच सांगितले की, पंढरपूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस ज्या पद्धतीने काम करीत आहे. त्याचा आदर्श राज्याने घ्यावा व अजित दादा आज आपल्यात नाहीत. गोष्ट अजूनही मनाला वेदना देणारे आहे.

आज पर्यंत पंढरपूर शहरातील रिंक रोड येथील डिव्हायडर मध्ये वृक्षारोपण व ज्येष्ठ नागरिकांसाठी वाचनालय, बालकाच्या मध्ये अनुदान वाटप. गरजू मुलांना व्हावे यांचे वाटप सायकली वाटप, सामाजिक उपक्रम राबवण्यात आले आहेत. आपल्या नेते विषय असलेले प्रेम व त्यांनी घालून दिलेली शिकवण झोपणारी कार्यकर्ते घडले पाहिजे असे प्रणव परिचारक यांनी मत व्यक्त केले.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ ही ग्रामीण महाराष्ट्राचा कणा ठरणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा म्हणजे शेतकरी. शेतीवर अवलंबून असलेल्या लाखो कुटुंबांचे जीवन निसर्गाच्या लहरीपणावर ठामपणे टिकून असते. अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी, महापूर यांसारख्या नैसर्गिक आपत्ती केवळ पिकांचे नुकसान करतात असे नाही तर त्याचबरोबर संपूर्ण अर्थचक्र हादरवतात. पिके हातातून निसटली की उत्पन्न घटते, उत्पन्न घटले की घरखर्च आणि शेतीचा पुढचा हंगाम या दोन्ही बाबींमध्ये तूट निर्माण होते. या तुटीची भरपाई करण्यासाठी अनेक शेतकरी पुन्हा कर्जाकडे वळतात. आणि कर्जाची परतफेड वेळेवर झाली नाही तर थकबाकी वाढते. परिणामी, बँकिंग संस्थांमधून नव्याने कर्ज मिळणे कठीण होते. अशा प्रकारे शेतकरी कर्जबाजारीपणाच्या दुष्टचक्रात अडकतो.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाकडून गेल्या काही वर्षांत शेतकरी हिताच्या अनेक योजना राबविण्यात आल्या. छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना (२०१७), महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना (२०१९) आणि त्याअंतर्गत राबविल्या गेलेल्या प्रोत्साहनपर लाभ योजना (२०२२) या सर्व योजनांचा उद्देश मूलत: शेतकऱ्यांना दिलासा देणे हा होता. मात्र प्रत्यक्ष परिस्थिती पाहिली तर थकबाकी आणि कर्जबाजारीपणा हा मुद्दा अजूनही पूर्णपणे संपलेला दिसत नाही. नैसर्गिक आपत्तींचा प्रभाव सतत राहतो, त्यातून निर्माण होणारी अनिश्चितता शेतकऱ्यांना वारंवार संकटात टाकते. त्यामुळे केवळ एकदाच कर्जमुक्ती दिली तरी पुढील हंगामात पुन्हा कर्जाचा भार वाढू नये, परतफेडीसाठी शिस्त निर्माण व्हावी आणि बँकिंग यंत्रणा देखील सक्षम व्हावी, असा अधिक व्यापक आराखडा आवश्यक ठरतो.

याच गरजेतून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ हा निर्णय समोर येतो. सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्री महोदयांनी या योजनेची घोषणा केली. या योजनेचा सूर एकाच वेळी दोन दिशांना आहे-थकबाकीदार शेतकऱ्यांना प्रत्यक्ष दिलासा, आणि नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक प्रोत्साहन देऊन दीर्घकाळ टिकणारी वित्तीय शिस्त निर्माण करणे.

योजनामागची भूमिका : केवळ कर्जमाफी नाही, शेतकऱ्यांचा आत्मविश्वास-

शेतकरी कर्जमाफीच्या योजनांबाबत समाजात अनेकदा एकच प्रश्न उभा राहतो-कर्जमाफी दिली की प्रश्न सुटतो का? पण शेतकरी वास्तव वेगळे आहे. शेतकऱ्याचे आर्थिक चक्र शेतीच्या उत्पन्नावर चालते. आणि शेतीचे उत्पन्न हे निसर्गावर अवलंबून असते. त्यामुळे कर्जमाफी ही केवळ आर्थिक व्यवहार नसून शेतकऱ्यांच्या आत्मविश्वासाचा प्रश्न बनतो. एकदा थकबाकी कमी झाली, कर्जाचा ताण उतरला आणि पुढील हंगाम नियोजनबद्ध पद्धतीने हाताळता आला, तर शेतकरी पुन्हा उत्पादनाच्या वाटेवर येतो.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ या संदर्भात अधिक समजूतदार दृष्टी दाखवते. योजनेत दोन मुख्य प्रवाह दिसतात. पहिला प्रवाह थकबाकीदारांना कर्जमुक्ती देतो. दुसरा प्रवाह नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ देतो. यामुळे योजना एकाच वेळी सुट आणि शिस्त या दोन्ही गोष्टी साध्य करण्याचा प्रयत्न करते.

कर्जमुक्तीचे केंद्र : पात्रता कालावधी आणि थकबाकीची नेमकी व्याख्या-

या योजनेत कर्जमुक्ती देताना पात्रता कालावधी स्पष्ट करण्यात आला आहे. १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ दरम्यान घेतलेले अल्पमुदत पीक कर्ज या कर्जमुक्तीच्या कक्षेत येते. अशा प्रकारे योजनेचा लाभ मनमानीने देण्याऐवजी कर्ज कोणत्या कालावधीत घेतले आणि ते कोणत्या स्वरूपात आहे, याची मांडणी करण्यात आली आहे.

त्यानंतर थकबाकी स्थितीच्या संदर्भात देखील स्पष्टता आहे. ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ अखेर परतफेड न झालेली कर्जे योजनेच्या निकषांत बसतात. म्हणजेच लाभ देण्यासाठी वेळेची आणि थकीतपणाची निकषबद्ध मांडणी आहे.

सर्वसाधारण मर्यादा अशी की प्रति शेतकरी २ लाखांपर्यंत कर्जमुक्ती दिली जाणार आहे. ही मर्यादा महत्त्वाची ठरते कारण ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती वेगवेगळी असते. काही शेतकऱ्यांचे थकबाकी कर्ज तुलनेने कमी असते, तर काही शेतकऱ्यांवर अधिक भार असतो. प्रति शेतकरी २ लाखांपर्यंत कर्जमुक्ती ही मर्यादा लाभाची व्याप्ती निश्चित करून शेतकऱ्यांना वास्तविक दिलासा देण्याचा हेतू दर्शवते.

महात्मा फुले योजनेतील लाभार्थींसाठी विशेष तरतूद-

योजनेमध्ये एक विशेष घटक आहे-महात्मा फुले योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांसाठी. अशा शेतकऱ्यांना ५० हजारांपर्यंत कर्जमुक्ती देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. याचा अर्थ असा की पूर्वीच्या योजनांच्या लाभार्थ्यांना पूर्णपणे बाहेर ठेवून नवीन योजना सुरू न करता, सातत्य राखण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

या तरतुदीमुळे एकीकडे ज्यांनी पूर्वी योजनांचा लाभ घेतला त्यांच्यावरचा कर्जाचा भार पुन्हा हलका करण्याचा मार्ग तयार होतो, तर दुसरीकडे लाभार्थी समुदायामध्ये योजनेचा स्वीकार वाढण्याची शक्यता निर्माण होते.

एकवेळ समझोता (जढड)-

शेतकऱ्यांपैकी काहींची थकबाकी ही २ लाखांच्या पलीकडेही जाते. अशा परिस्थितीत केवळ थेट कर्जमुक्ती देण्याने आर्थिक ताळमेळ पूर्णपणे बसत नाही, आणि बँकिंग संस्थांच्या दृष्टीने देखील हे व्यवहार गुंतागुंतीचे ठरू शकतात. याच कारणासाठी योजनेत एकवेळ समझोता (जढड) हा घटक मांडण्यात आला आहे.

२ लाखांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनी प्रथम अतिरिक्त रक्कम परतफेड करावी आणि त्यानंतर २ लाखांचा लाभ मिळावा, अशी कार्यपद्धती दिली जाते. म्हणजेच लाभ पूर्णतः फुकट स्वरूपात नसून, अतिरिक्त भार उतरविण्यासाठी शेतकऱ्याकडून प्राथमिक प्रयत्न अपेक्षित आहेत. ही बाब वित्तीय शिस्तीच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते.

महात्मा फुले योजनेतील लाभार्थींसाठीही अशाच स्वरूपाची मांडणी आहे. ५० हजारांपेक्षा जास्त थकबाकी असल्यास अतिरिक्त रक्कम परतफेडीनंतर ५० हजारांचा लाभ मिळेल. यामुळे योजनेचे पॉइंट-बाय-पॉइंट तत्त्व स्पष्ट होते-शेतकऱ्यांना जिथे गरज जास्त आहे तिथे लाभ देताना परतफेडीची जबाबदारी देखील निश्चित केली जाते.

छझ खात्यांवर तोडगा-

कर्ज थकबाकीत राहिले की ते अनेकदा बँकांच्या वर्गवारीमध्ये छझ स्वरूप धारण करते. अशा खाती व्यवहार्यरित्या सोडविणे कठीण असते, कारण त्यामध्ये कायदेशीर-प्रशासकीय आणि आर्थिक तरतुदींचा समावेश होतो. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ या बाबतीत एक व्यावहारिक मार्ग देते.

योजनेत छझ खात्यांसाठी बँकांशी वाटाघाटी करून सुट देण्याची रक्कम निश्चित केली जाईल, असे नमूद करण्यात आले आहे. याचा अर्थ असा की छझ खात्यांवर उपाययोजना करताना बँकांच्या आर्थिक नियमांनुसार आणि व्यवहार्य आकडेवारीनुसार निर्णय होईल. त्यामुळे शेतकरी आणि बँक दोघांनाही स्वीकारार्ह असा तोडगा मिळण्याची शक्यता वाढते.

प्रोत्साहनपर लाभ : नियमित परतफेड करणाऱ्यांना ५० हजारांपर्यंत लाभ-

मागील योजनांनी कर्जमुक्तीचा दिलासा दिला असला तरी थकबाकीचा मूळ कारण कर्ज फेडण्यात सातत्य नसणे आणि नैसर्गिक आपत्तींमुळे उत्पन्न चक्र बिघडणे असे होते. त्यामुळे पुढची गरज अशी उभी राहते की परतफेडीसाठी शेतकऱ्यांमध्ये प्रेरणा निर्माण झाली पाहिजे. याच दृष्टीने या योजनेत प्रोत्साहनपर लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

नियमित परतफेड करणारे शेतकरी २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ या तीन वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत वेळेत परतफेड केल्यास ५० हजारांपर्यंत लाभ घेऊ शकतात. यामुळे लाभ मिळवण्यासाठी केवळ एकदाच नाही तर परतफेडीची सातत्यपूर्ण सवय निर्माण होण्याची शक्यता वाढते.

योजनेमध्ये एक आणखी महत्त्वाची तरतूद आहे-जर कर्ज रक्कम तुलनेने कमी असेल, तर प्रत्यक्ष परतफेड केलेली रक्कम किंवा किमान ५ हजार यापैकी जे अधिक असेल ते लाभ म्हणून मिळेल. ही तरतूद कमी थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनाही न्याय्य लाभ मिळावा यासाठी आहे.

कोण पात्र नाही? अपात्र व्यक्तींची स्पष्ट यादी-

कर्जमुक्ती आणि प्रोत्साहनपर लाभ देताना गैरलाभ टाळणे आवश्यक असते. या योजनेत अपात्र व्यक्तींची स्पष्ट यादी दिलेली आहे.

अपात्रांमध्ये मंत्री, खासदार, आमदार, स्थानिक स्वराज्य संस्थांचे सदस्य यांचा समावेश आहे. केंद्र/राज्य शासनाचे अधिकारी-कर्मचारी, ज्यांचे वेतन २५,००० पेक्षा जास्त आहे, ते अपात्र ठरतात. सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचे अधिकारी-कर्मचारी देखील यामध्ये येतात.

शेतीबाह्य उत्पन्नावर आयकर भरणारे, तसेच निवृत्तीवेतनधारक ज्यांचे पेन्शन २५,००० पेक्षा जास्त आहे (माजी सैनिक वगळून) अपात्र ठरतात. सहकारी संस्थांचे पदाधिकारी व अधिकारी ज्यांचे वेतन २५,००० पेक्षा जास्त आहे, तेही पात्र नाहीत. अशा प्रकारची अपात्रता यादी योजनेचा लाभ खरंच शेतीवर अवलंबून असलेल्या गरजू शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावा यासाठीचा प्रयत्न दर्शवते.

अंमलबजावणीची पद्धत : ऑनलाईन प्रक्रिया, आधार प्रमाणीकरण आणि ॲग्रीस्टॅक नोंदणी-

कोणतीही मोठी योजना यशस्वी होण्यासाठी पारदर्शक अंमलबजावणी अत्यंत महत्त्वाची असते. या योजनेत अंमलबजावणी प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. आधार प्रमाणीकरण आणि ॲग्रीस्टॅक नोंदणी अनिवार्य करण्यात आलेली आहे.

याचा परिणाम म्हणजे लाभार्थी निवडीतील गोंधळ कमी होणे, बनावट/दुबार नोंदी टाळणे, आणि पात्रता निकषांची पडताळणी जलद होणे. आधार आणि ॲग्रीस्टॅकसारखी प्रणाली असल्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीशी संबंधित माहिती आणि लाभाची पात्रता अधिक खात्रीशीर ठरू शकते.

प्रशासकीय संरचना : मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती

योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनातील समन्वय महत्त्वाचा असतो. योजनेत मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती गठीत करण्याची तरतूद आहे. यामुळे धोरणात्मक निर्णय, अंमलबजावणीतील अडथळे, आणि बँकिंग यंत्रणेतील सहकार्य यांवर लक्ष ठेवण्याचा प्रशासकीय आराखडा तयार होतो.

उपसमितीचा आधार असल्यामुळे जिल्हानिहाय अंमलबजावणीतील विसंगती कमी करण्यास मदत होऊ शकते. तसेच शेतकरी स्तरावर लाभ पोहोचण्यासाठी आवश्यक ती शिस्त आणि वेळापत्रक पाळली जाईल, अशी अपेक्षा निर्माण होते.

योजनेचे महत्त्व : तातडीचा दिलासा आणि दीर्घकालीन सुधारणा

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ चे महत्त्व तीन पातळ्यांवर ठळक दिसते.

पहिली पातळी म्हणजे कर्जमुक्तीचा थेट दिलासा. २ लाखांपर्यंत कर्जमुक्ती ही थकबाकीदार शेतकऱ्यांसाठी मोठा आधार ठरू शकते. थकबाकी उतरल्यावर बँकिंग व्यवहार सुधारण्यास मदत होते आणि शेतकऱ्याला पुढील हंगामासाठी संधी निर्माण होते.

दुसरी पातळी वित्तीय शिस्तीला प्रोत्साहन. नियमित परतफेड करणाऱ्यांना ५० हजारांपर्यंत लाभ देणे हा केवळ आर्थिक लाभ नाही तर वर्तन बदल घडवण्याचा प्रयत्न आहे. परतफेड वेळेवर केल्यास लाभ मिळतो, ही प्रेरणा पुढील काळात कर्ज परतफेडीची शिस्त वाढवू शकते.

तिसरी पातळी म्हणजे बँकिंग यंत्रणेची क्षमता वाढवणे. छझ खात्यांवर वाटाघाटी करून सुट निश्चित करण्याचा मार्ग बँकिंग संस्थांसाठी व्यवहार्य ठरू शकतो. यामुळे कर्ज वसुलीची प्रक्रिया अधिक सुधारू शकते आणि बँकांच्या आर्थिक ताळेबंदावरचा भारही व्यवस्थापित राहू शकतो.

सामाजिक-आर्थिक परिणाम-

योजनेचा सर्वात मोठा प्रभाव ग्रामीण समाजजीवनावर पडणार आहे. शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढणे हे एक तात्काळ परिणाम म्हणून दिसू शकते. कर्जाची भीती कमी झाली की शेतकरी पुढील नियोजन करतो-पेरणीचे तंत्र, बियाणे आणि खते निवड, तसेच कर्जाचे पुढील नियोजन याबाबत तो अधिक सजग होतो.

दुसरा परिणाम म्हणजे कर्जबाजारीपणाचे दुष्टचक्र थांबवण्याचा प्रयत्न. जर थकबाकी कमी झाली आणि नियमित परतफेडीसाठी प्रोत्साहन मिळाले, तर भविष्यात कर्ज वाढण्याचा वेग कमी होण्याची शक्यता वाढते.

तिसरा परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्था स्थिर होणे असा आहे. ग्रामीण भागात ग्राहकांची खरेदी क्षमता कर्जामुळे कमी होते. कर्जबाजारीपणा वाढला की खर्च मर्यादित होतो आणि स्थानिक अर्थव्यवस्था मंदावते. कर्जाचा भार कमी झाल्यास ग्रामीण रोजगार आणि व्यवहारांना काही प्रमाणात चालना मिळते.

याशिवाय बँकिंग व्यवहार सुधारण्याची देखील शक्यता आहे. बँकांसाठी छझ सोडविण्याच्या स्पष्ट चौकटीमुळे व्यवहारांची गती वाढू शकते.

दीर्घकालीन दृष्टीने या योजनेला शेती आणि पूरक व्यवसायांसाठी धोरणात्मक शिफारसी देण्याचा प्रयत्नही जोडला गेला आहे. केवळ कर्जमुक्ती नव्हे तर शेतीसाठी टिकाऊ धोरणे विकसित करण्याचा विचार पुढे आला तर हा उपक्रम अधिक व्यापक परिणाम देऊ शकतो.

आव्हाने-

कोणतीही योजना जाहीर होणे ही सुरुवात असते. प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याची प्रक्रिया आणि अंमलबजावणीची पारदर्शकता ही यशाची गुरुकिल्ली ठरते. ऑनलाईन प्रक्रिया, आधार प्रमाणीकरण, ॲग्रीस्टॅक नोंदणी या बाबी अंमलबजावणीला मजबूत आधार देतात. तरीही विविध स्तरांवर-बँका, जिल्हाधिकारी कार्यालये, कृषी विभाग, आणि शेतकरी नोंदींची छाननी-येथे कार्यक्षम समन्वय आवश्यक असतो.

जढड, छझ खाती, आणि २ लाखांपेक्षा जास्त थकबाकीदार शेतकऱ्यांची वर्गवारी करताना वेळेवर निर्णय झाले, आणि लाभांची रक्कम पारदर्शकरीत्या ठरवली गेली, तर योजनेवरचा विश्वास अधिक दृढ होऊ शकतो.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ ही योजना महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी निश्चितच महत्त्वाची ठरू शकते. थकबाकीदार शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमुक्ती देण्याचा थेट दिलासा हा या योजनेचा मुख्य आधार आहे. त्याचबरोबर नियमित परतफेड करणाऱ्यांना ५० हजारांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देऊन वित्तीय शिस्त निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. छझ खात्यांवर वाटाघाटी करून सुट देण्याची तरतूद बँकिंग यंत्रणेला व्यवहार्य आधार देऊ शकते.

शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढणे, कर्जबाजारीपणाचे दुष्टचक्र कमी होणे, ग्रामीण अर्थव्यवस्था स्थिर होणे, आणि बँकिंग व्यवहार अधिक सक्षम होणे अशी दीर्घकालीन उद्दिष्ट साध्य करणारी योजना आहे. त्यामुळे योग्य अंमलबजावणी, वेळापत्रक पाळणे, आणि लाभार्थी निवडीतील पारदर्शकता कायम ठेवली, तर ही योजना ग्रामीण महाराष्ट्राचा खऱ्या अर्थाने कणा ठरणार आहे.

**- सुनील सोनटक्के**
**जिल्हा माहिती अधिकारी सोलापूर**

# अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरण रद्द करण्याकरिता मुंबईत निघालेला हा विराट अतिभव्य असा महामोर्चा!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/विशेष प्रतिनिधी :देशातील इतिहासात प्रथमच समस्त अनुसूचित जातीमधील सर्व घटकांनी एकत्र येत आरक्षण उपवर्गीकरणाला प्रचंड विरोध दर्शविला. समस्त अनुसूचित जातीमधील सर्व घटकांना एकत्र करण्याचा बहुमान सरसेनानी आदरणीय आयु. आनंदराजजी आंबेडकर साहेब आणि आदरणीय आयु. भीमरावजी आंबेडकर साहेब यांना दिलाच पाहिजे. महाराष्ट्राच्या इतिहासात केवळ बौद्धांचे ऐक्य दिसून आले नाही तर चर्मकार समाजातील सर्वात मोठ्या तीन संघटना सुद्धा पहिल्यांदाच एकाच मंचावर



संघटितपणे एकत्र आल्या. ढोर समाज, होलार समाज, हिंदू खाटीक समाज, कक्कया समाज, भंगी समाज, मेहतर समाज, डक्कलवार समाज तसेच दक्षिण भारतातील माला समाजातील हजारो बंधू - भगिनी उपस्थित होते.

मंचावर आदरणीय आयु. आनंदराजजी आंबेडकर साहेब, आदरणीय आयु. भीमराव आंबेडकर साहेब, आयु. अमन आंबेडकर साहेब, आयु. बबनरावजी घोलप साहेब, आयु. आ. राजकुमार बडोले साहेब, आयु. आ. सिद्धार्थ खरात साहेब, आयु. जोगेंद्र कवाडे साहेब, आयु. आ. ज्योती गायकवाड ताई, मा. आ. राम पंडागळे साहेब, मा. बाबुराव माने साहेब, आयु. एस. के. भंडारे साहेब, आयु. अरुण गाडे साहेब, आयु. सुरेश माने साहेब, आयु. सागर संसारे साहेब, आयु. अशोक कांबळे साहेब, आयु. विश्वदिप करंजीकर, आयु. बलराज दाभाडे, आयु. मनोज गायकवाड, आयु. आशिष गाडे, आयु. स्मिता कांबळे ताई, ॲड. गुणरत्न सदावर्ते, ॲड. जयश्री पाटील यांच्यासह पूज्य भिकखू संघ उपस्थित होते.

महामोर्चाचे एक टोक मेट्रो सिनेमा तर दुसरे टोक बीएमसी मुख्यालय पर्यंत होते. मोर्चा सुरु झाल्यावर मुसळधार पावसाने हजेरी लावून सुद्धा मोर्चातील गर्दी किंचित सुद्धा कमी झाली नाही. समस्त अनुसूचित जातीची एकजूट अशीच पुढे कायम राहो अशी तथागत चरणी मंगल कामना व्यक्त करतो. मोर्चा प्रचंड यशस्वी करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष, दिवस-रात्र राबलेल्या सर्व संयोजक, नेते, कार्यकर्ते व शिस्तबद्ध मोर्चा पार पाडल्याबद्दल अखिल भारतीय समता सैनिक दलाचे यासह राज्य भरातील कार्यकर्ते सामाजिक संघटना पदाधिकारी उपस्थित होते.



हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# राज्यातील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या आधुनिकीकरणासाठी ५ हजार ४०० कोटींचा निधी देणार : कौशल्य मंत्री मंगलप्रभात लोढा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विद्यार्थ्यांसाठीचा शुभेच्छा संदेश चित्रफितीद्वारे दाखवण्यात आला

**■ करमाळा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे मदनदास देवी औद्योगिक प्रशिक्षण संस्था असे नामांतर झाले**

**■ मदनदास देवी यांनी विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणून त्यांच्यामध्ये राष्ट्रभक्ती व शिक्षणाची ज्योत प्रज्वलित केली.**

**■ स्थानिक युवकांच्या मागणीला प्रतिसाद देत कौशल्य मंत्री श्री. लोढा यांनी नवीन ५ अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय जाहीर केला, तर राज्याच्या प्रत्येक औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शॉर्ट टर्म कोर्स ही सुरू करणार**

**■ राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात दोन औद्योगिक प्रशिक्षण संस्था टाटा समूहाच्या आर्थिक सहकार्यातून सुरू करणार**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : राज्यभरातील सर्व विद्यार्थ्यांना सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून त्यांच्या आवडीचे तसेच कौशल्य आधारित अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहेत. त्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या आधुनिकीकरणासाठी पुढील पाच वर्षात एकूण ५ हजा ४०० कोटीचा निधी खर्च करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली.

या कार्यक्रमास आमदार नारायण पाटील, माजी आमदार राम सातपुते, नगराध्यक्ष मोहिनी सावंत, जिल्हा परिषद सदस्य रश्मी बागल, प्रमुख पाहुणे सुनील आंबेकर, औद्योगिक प्रशिक्षण संचालक सतीश सूर्यवंशी, सहसंचालक चंद्रशेखर ठेगडे, कौशल्य रोजगार उद्योजकता सह आयुक्त संगीता खंदारे, प्रा. मनोज बिडकर यांच्यासह विविध मान्यवर व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच विद्यार्थीही मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री श्री. लोढा पुढे म्हणाले की, राज्य शासनाने पुढील पाच वर्षात ५ हजार ४०० कोटीचा निधी उपलब्ध करून सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे आधुनिकीकरण करून कौशल्य आधारित अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. तसेच येत्या ६ महिन्यांच्या कालावधीत टाटा उद्योग समूहाच्या आर्थिक सहकार्यातून प्रत्येक जिल्ह्यात दोन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्याचा तसेच राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यातील औद्योगिक संस्थेत शॉर्ट टर्म कोर्सही सुरू करण्याचा मानस असल्याचेही त्यांनी सांगितले.




शहराबरोबरच गावातील युवकांना कुशल बनवण्यात येईल, असा भर देत गाव आणि देश आर्थिक दृष्ट्या सक्षम होण्यासाठी कौशल्य विकास महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांच्या उद्योगनिष्ठ विचारांना चालना देताना तंत्रज्ञान व कौशल्य यांचा समन्वय साधला जाईल, असे श्री. लोढा यांनी सांगून मदनदास देवी यांच्या कार्याचा संदर्भ देत विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी कौशल्य शिक्षण आणि उद्योजकतेकडे वळण्याचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थी परिषदांच्या माध्यमातून विद्यार्थी शिकून संघटित होऊन कुशल उद्योजक बनावा व आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावा, यासाठी त्याला उद्योजकता शिक्षण मिळायला हवे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

मदनदास देवी यांच्या कार्याच्या प्रेरणेतून औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला शासनाच्या वतीने मदनदास देवी औद्योगिक प्रशिक्षण संस्था असे नामांतर करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. मदनदास देवी यांचा जन्म करमाळ्यात झाला असून विद्यार्थ्यांसाठी आणि देशासाठी केलेल्या त्यांच्या कार्यामुळे करमाळा वाशीयांसाठी अभिमान आणि प्रेरणेची बाब आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणून त्यांच्यामध्ये राष्ट्रभक्ती व शिक्षणाची ज्योत प्रज्वलित केली. त्यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी शिक्षण घ्यावे, असे आवाहन श्री. लोढा यांनी केले. तसेच यावेळी येथील स्थानिक युवकांनी केलेल्या मागणीला अनुसरून त्यांनी नवीन पाच अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय जाहीर केला. यावेळी आमदार नारायण आबा पाटील यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभेच्छा**

या कार्यक्रमाच्या प्रसंगी माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मदनदास देवी यांनी विद्यार्थ्यांसाठी केलेल्या कार्याविषयी गौरवउद्गार काढले. तर या प्रशिक्षण संस्थेचे नामांतर मदनदास देवी औद्योगिक प्रशिक्षण संस्था असे झाल्याने विद्यार्थ्यांच्या मनात त्यांचे प्रेरणादायी विचार सदैव राहतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मुख्यमंत्री यांनी चित्रफितीच्या माध्यमातून कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.

प्रारंभी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा नामांतर समारंभ पार पडला. या प्रसंगी कोनशिलाचे अनावरण करण्यात आले. तसेच वृक्षारोपण करून व्यासपीठावर स्वर्गीय मदनदास देवी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनोज बिडकर यांनी केले, तर मान्यवरांचे आभार आयएमसीचे चेअरमन खुशालचंद राठी यांनी व्यक्त केले.

## महाराष्ट्र राज्य कामगार सेना राज्य सचिवपदी मिलिंद भाऊ काळे यांची नियुक्ती




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने व शिवसेना मुख्य नेते माननीय श्री. एकनाथ शिंदे (उप-मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य) यांच्या आदेशानुसार शिवसेना राष्ट्रीय कर्मचारी सेना संलग्न महाराष्ट्र राज्य कामगार सेना महाराष्ट्र राज्य सचिव पदी मिलिंद भाऊ काळे यांची नियुक्ती करण्यात आली. नियुक्ती पत्र देतांना शिवसेना माथाडी कामगार सेना व महाराष्ट्र राज्य कामगार सेना संस्थापक अध्यक्ष जेरीभाई डेव्हिड व मुंबई नगरसेवक मा.मंगेश साटमकर यांच्या हस्ते देण्यात आले.

याप्रसंगी कार्याध्यक्ष राजेंद्र सुर्वे खजिनदार राजेश सकपाळ सरचिटणीस जयंत साठे,राजा ठाकूर, नागेश तवटे, अनिल भोईर,अमर लोखंडे, शैलेश बागुल सुमित जाधव राहुल पगारे दशरथ कडाळे रोहित निकम आदी मान्यवर उपस्थित होते.

भाऊ हार्दिक अभिनंदन व भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.

शुभेच्छुक मूकनायक कामगार संघटना सर्व पदाधिकारी व सभासद.

## शरद सरकटे.व धनंजय आव्हाळे यांना राज्यस्तरीय कर्तव्यदक्ष पुरस्कार जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे/ बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : संकल्प बहुद्देशीय संस्थेच्या वतीने दिला जाणारा . प्रतिष्ठित राज्यस्तरीय कर्तव्यदक्ष पुरस्कार यंदा सिंदखेडराजा तालुक्यातील सायाळा येथील प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते.शरद शंकर सरकटे.व धनंजय सुभाष आव्हाळे.यांना जाहीर झाला आहे जुलै २०२६ मध्ये शेगाव येथे आयोजित एका भव्य सोहळ्यात





हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. कार्य तुमचे कर्तव्य आमचे हे ब्रिद वाक्य घेऊन सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या संकल्प बहुद्देशीय संस्थेच्या वतीने दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित केले जाते. त्यात शरद सरकटे. व धनंजय आव्हाळे यांनी सामाजिक क्षेत्रात केलेल्या अविरत आणि मोलाच्या कामगिरीची दखल घेऊन यंदा त्याची दखल घेऊन यंदा त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन मुख्य आयोजिका प्रतिक्षा वासनिक.यांच्या मार्गदर्शनाखाली केले जात आहे.जुलै २०२६मध्ये शेगाव येथे होणाऱ्यां या कार्यक्रमाला अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.धनंजय आव्हाळे.व शरद सरकटे यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सर्व स्तरावरुन त्यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे.

## युनियन बँकेचे शाखाधिकारी प्रशांत आवताडे व केंद्र प्रमुख सतीश शिंदे यांचा सत्कार




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील भाळवणी येथील ग्रामपंचायत कार्यालयात युनियन बँकेचे नूतन शाखाधिकारी प्रशांत आवताडे यांचा सत्कार पंचायत समिती सदस्य विजय शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला.तसेच नुतन जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे भाळवणी केंद्र प्रमुख सतीश शिंदे यांचा पांडुरंगचे माजी संचालक हरिभाऊ शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी सरपंच रणजित जाधव, युवा उद्योजक शकील काझी,प्रशांत माळवदे, बापू वाघमारे, सोमनाथ पाटील,राजाभाऊ शिंदे, राहुल शिंदे, कल्याण गवळी,हर्षद गवळी, विलास लाले आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी आभार ग्रामविकास अधिकारी डी एस वाघमारे यांनी आभार मानले.

### शेतकऱ्यांचा सवाल मुख्यमंत्री व ऊर्जा मंत्र्यांकडे हस्तक्षेपाचे मागणी

## शासकीय जमीनी सोडून शेतकऱ्यांच्या हक्काच्या जमिनीच का?





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : 'द्राक्षांची कॅलिफोर्निया' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या निफाड तालुक्यातील सारोळे खुर्द येथे महावितरण व महापारेषणच्या वीजवाहिनी प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणावर उंच टॉवर उभारण्याचे काम सुरू आहे. मात्र या कामामुळे अनेक अल्पभूधारक शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून, त्यांच्या रस्त्यालगतच्या मौल्यवान शेतीजमिनींवर टॉवर उभारले जात असल्याचा आरोप बाधित शेतकऱ्यांकडून केला जात आहे.

नाव जाहीर न करण्याच्या अटीवर काही शेतकऱ्यांनी सांगितले की, संबंधित ठेकेदार व काही अधिकारी शेतकऱ्यांची संमती न घेता किंवा त्यांच्याशी योग्य चर्चा न करता टॉवरचे नियोजन करत आहेत. काही ठिकाणी शासकीय पडीत जमीन उपलब्ध असतानाही खाजगी शेतकऱ्यांच्या जमिनींची निवड केली जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाची भावना आहे.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, रस्त्यालगतची जमीन ही भविष्यात व्यावसायिक वापरासाठी, गोदाम, कृषी सेवा केंद्र, प्रक्रिया उद्योग किंवा इतर पूरक व्यवसायासाठी महत्त्वाची ठरू शकते. अशा जमिनीवर टॉवर उभारल्यास त्या जमिनीचा विकासाचा मार्ग बंद होऊन भविष्यातील उत्पन्नाच्या संधी हिरावल्या जातील.आधीच अवकाळी पाऊस, दुष्काळ, वाढते उत्पादन खर्च आणि बाजारभावातील अनिश्चितता यामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी ही परिस्थिती आणखी गंभीर ठरत असल्याचेही त्यांनी नमूद केले. काही ग्रामपंचायतींच्या पातळीवर योग्य माहिती न देता किंवा शेतकऱ्यांचा विश्वासात न घेता प्रक्रिया होत असल्याचाही आरोप काही शेतकऱ्यांनी केला आहे.यासंदर्भात संबंधित अधिकारी व ठेकेदारांकडून शेतकऱ्यांशी संवाद साधण्याऐवजी कायद्याची भाषा वापरून दबाव आणला जात असल्याचा दावाही काही बाधित शेतकऱ्यांनी केला आहे. या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नसली तरी प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी होत आहे.बाधित शेतकऱ्यांनी शासनाकडे मागणी केली आहे की, ज्या ठिकाणी शासकीय जमीन उपलब्ध आहे तेथेच महापारेषणचे टॉवर उभारण्यात यावेत. तसेच, खाजगी जमिनीवर टॉवर उभारणे अपरिहार्य असल्यास रस्त्यालगतच्या मौल्यवान भागाऐवजी शेताच्या मागील बाजूस टॉवरचे नियोजन करून शेतकऱ्यांचे भविष्यातील नुकसान टाळावे.या संदर्भात मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी या अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या जीवन-मरणाच्या प्रश्नात लक्ष घालून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी बाधित शेतकऱ्यांकडून होत आहे.

आता या प्रकरणात जिल्हा प्रशासन, महापारेषण, महावितरण आणि लोकप्रतिनिधी कोणती भूमिका घेतात, तसेच शेतकऱ्यांच्या मागण्यांवर काय निर्णय घेतला जातो, याकडे संपूर्ण निफाड तालुक्याचे लक्ष लागले आहे.

> **रस्त्यालगतच्या सुपीक जमिनीवर महापारेषण चे टावर उभारून आधीच मेटाकुटीला आलेल्या बळीराजाला भिकेला लावायचे आहे का, दोन अडीच एकर जमिनी टावर उभारून संबंधित शेतकऱ्यांना वाणिज्य जमिनीपासून वंचित करायचे आहे का, कारण एखाद्या शेतकऱ्यांच्या शेतात विजेचा टावर झाला की त्याला कुठल्याही कामासाठी शासकीय परवानगी मिळत नाही तो त्या शेतात कुठलेही व्यावसायिक काम उभारू शकत नाही त्यामुळे अल्पभूधारक शेतकरी भकास करू करून कुठला विकास शासन करणार आहे, अशी संतप्त भावना बाधित शेतकऱ्यांमधून व्यक्त केले जात आहे.**
>
> **– एक बाधीत शेतकरी**

## भीमनगर येथे ग्रामपंचायतीची विशेष ग्रामसभा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील गांधीनगर सोळसे लमाण तांडा या ग्रामपंचायतीची विशेष ग्रामसभा भीमनगर येथे संपन्न झाली.

या वेळी केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजना (PM-JY) अंतर्गत राज्यातील २८ जिल्ह्यात निवड करण्यात आलेल्या ७४१ गावांपैकी आपले भीमनगर गाव निवडण्यात आल्याची माहिती ग्रामसेवक संदीप पाचंगे यांनी दिली.

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजना (झच-गध) अंतर्गत महाराष्ट्रातील २८ जिल्ह्यांमधील निवड करण्यात आलेल्या ७४१ गावांमध्ये २३ जून ते २५ जून २०२६ या कालावधीत विशेष ग्रामसभा व संयुक्त पडताळणी मोहीम राबविण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार ही मोहीम आयोजित करण्यात येत असून जिल्हा प्रशासन आणि जिल्हा परिषद प्रशासनाकडून त्याचे नियोजन करण्यात आले आहे.

या मोहिमेअंतर्गत प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजनेची जनजागृती, गावांच्या विकासात्मक गरजांची ओळख, ग्राम विकास आराखडे (VDPs) तयार करणे व त्यांना ग्रामसभेची मंजुरी मिळवून देणे, ज्या गावांचे ग्राम विकास आराखडे (VDPs) तयार केलेले आहेत, त्या तज्ञी ना जिल्हास्तरीय समितीची अंतिम मान्यता देणे, अशी कार्यवाही होणार आहे. ज्या गावांचे गुणांकन ७० किंवा त्यापेक्षा अधिक असेल, त्या गावांना 'आदर्श ग्राम' म्हणून घोषित करण्यात येणार आहे. तसेच आदर्श ग्राम म्हणून घोषित झालेल्या गावांमध्ये केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा प्रभावी समन्वय साधण्यावर भर दिला जाणार असल्याचेही ग्रामसेवकांनी सांगितले.

**प्रधानमंत्री अजय योजने अंतर्गत आदर्श ग्राम बनण्याच्या संकल्प**

या प्रसंगी ज्येष्ठ नागरिक शरणप्पा जन्ना, रिपाइंचे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी, डाटा ऑपरेटर चिदानंद शिंगे, हणमंत झळकी, लक्ष्मण लोड्डेन, गौतम झळकी, विजयकुमार धोडमनी, निर्मला गायकवाड, पत्रकार निंगप्पा निंबाळ, खाजप्पा शिंगे ऊर्फ गायकवाड, लक्ष्मण रेऊरे, रवी धोडमनी, भीमा गायकवाड व सचिन धोडमनी सह इतर ग्रामस्त उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी अभ्यासासह भविष्याचाही वेध घ्यावा



## सचिन डोंगरवार यांचे प्रतिपादन : नंगपुरामुर्री निवासी शाळेत प्रवेशोत्सव, वृक्षारोपण व मार्गदर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोंदिया : माणसाने जन्मतः काहीच केलेले नसते. पण जन्माला आल्यावर त्याची संपूर्ण जबाबदारी वाढते. आणि ती विद्यार्थी दशेपासून असते. म्हणून विद्यार्थ्यांनी अभ्यासासह भविष्याचाही वेध घ्यावा. असे प्रतिपादन सहाय्यक वनसंरक्षक सचिन डोंगरवार यांनी केले आहे. ते कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

यावेळी मंचावर शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख पाहुणे पालक राजु पंडाल, जयकुमार डहाट तसेच महिला पालक उपस्थित होते.

प्रसंगी शाळेतील नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत करुन प्रवेशोत्सव करण्यात आले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, पाठ्यपुस्तक, गणवेश आदी देऊन सत्कार करण्यात आले. तसेच प्रवेशोत्सव सेल्फी कार्नरवर स्वागत करण्यात आले.

मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

या नवनवीन नवगतांचे स्वागत कार्यक्रमाची भूमिका विषद करताना प्रास्ताविक मार्गदर्शन प्रा. मुन्नाभाई नंदागवळी मांडली. शिक्षक संचालन प्रदिप ढवळे यांनी करून प्रा. नीता भलमे यांनी आभार व्यक्त केले.

कार्यक्रमासाठी प्रा. पुष्कराज लांजेवार, शिक्षक साधना पारधी, आशिष शहारे, तुषार महाजन, कार्तिक शहारे, दीक्षा तुरकर, नीशा गभणे, संगीता कुंभारे, प्रणय खांडेकर यांनी परिश्रम घेतले.

# पडघा टोल नाक्यावरील दुचाकी मार्गात साचले पाणी; अपघाताचा धोका वाढला

## टोल प्रशासनाच्या सुरक्षाविषयक दुर्लक्षावर नागरिकांचा सवाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी-नाशिक महामार्गावरील मुख्य पडघा टोल नाक्यावर भिवंडीच्या दिशेने जाणाऱ्या दुचाकी मार्गात मोठ्या प्रमाणात पाणी साचले असून त्याच ठिकाणी खड्डाही पडला आहे. त्यामुळे दुचाकीस्वारांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून अपघाताची शक्यता वाढली आहे. टोल नाक्यावरून दररोज हजारो दुचाकीस्वार प्रवास करत असतानाही या समस्येकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.





पडघा टोल नाक्यावरून दररोज अनेक नागरिक कामाच्या ठिकाणी जाण्यासाठी, तसेच पालक आपल्या पाल्यांना शाळेत ने-आण करण्यासाठी दुचाकीचा वापर करतात. याशिवाय पडघा परिसरातील विद्यार्थी आणि स्थानिक नागरिकही याच मार्गाचा मोठ्या प्रमाणात वापर करतात. मात्र दुचाकी मार्गात साचलेल्या पाण्यामुळे वाहन घसरण्याची भीती निर्माण झाली आहे. धोकादायक परिस्थितीमुळे अनेक दुचाकीस्वार दुचाकी मार्ग टाळून चारचाकी वाहनांच्या लेनमधून प्रवास करत असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे दुचाकी व मोठ्या वाहनांमध्ये अपघात होण्याचा धोका अधिक वाढला आहे. प्रवाशांकडून नियमित टोल वसूल केला जात असताना त्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यात टोल प्रशासन अपयशी ठरत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. टोल नाक्यावरच अशा प्रकारची धोकादायक परिस्थिती निर्माण होणे ही गंभीर बाब असून, भविष्यात एखादा अपघात झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा सवालही उपस्थित केला जात आहे.

दुचाकी मार्गात पाणी नेमके कोणत्या कारणामुळे साचत आहे, तसेच त्यावर तातडीने उपाययोजना का करण्यात येत नाही, याबाबत पडघा टोल प्रशासनाने स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी वाहनचालकांनी केली आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही समस्या तातडीने सोडवून दुचाकी मार्ग सुरक्षित करण्यात यावा, अशी मागणी प्रवासी, विद्यार्थी आणि स्थानिक नागरिकांकडून जोर धरत आहे.

# चेन स्नॅचिंग करणारी सराईत टोळी जेरबंद; दहा गुन्हे उघड, ४.७६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नाशिक ग्रामीण जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने हिसकावून पसार होणाऱ्या चेन स्नॅचिंगच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. या पार्श्वभूमीवर स्थानिक गुन्हे शाखेने निफाड परिसरात राबविलेल्या धाडसी कारवाईत सराईत चेन स्नॅचिंग टोळीला जेरबंद करत जिल्ह्यातील तब्बल दहा गुन्हे उघडकीस आणण्यात यश मिळविले आहे.





पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली चेन स्नॅचिंग प्रवण भागात गस्त, नाकाबंदी व विशेष तपास मोहीम सुरू असताना स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे निफाड चौफुली परिसरात सिनेस्टाईल पाठलाग करून दोन संशयितांना ताब्यात घेण्यात आले. त्यांची चौकशी केल्यानंतर आणखी दोन आरोपींना अटक करण्यात आली. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये विशाल पोपट सांगळे (रा. सातपूर, नाशिक), गणेश ऊर्फ कुलदीप मनोहर कापसे (रा. पेठ रोड, नाशिक), रोहित केशव गायकवाड (रा. भाऊनगर, पिंपळगाव बसवंत) आणि विनय पांडुरंग उज्जैनकर (रा. अश्वमेध नगर, नाशिक) यांचा समावेश आहे.

चौकशीत आरोपींनी सायखेडा, निफाड, दिंडोरी, पिंपळगाव बसवंत, ओझर, वावी आणि लासलगाव पोलीस ठाण्यांच्या हद्दीत महिलांचे सोन्याचे दागिने जबरीने हिसकावल्याची कबुली दिली. या टोळीने चोरी केलेले दागिने विनय उज्जैनकर याला विकल्याचेही निष्पन्न झाले. या कारवाईत पोलिसांनी ४८ ग्रॅम सोन्याची लगड, गुन्ह्यात वापरलेली यामाहा एफ झेड -एस मोटारसायकल, मोबाईल फोन असा एकूण ४ लाख ७६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. उर्वरित चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यासाठी तपास सुरू आहे.

तपासा दरम्यान सायखेडा, निफाड, दिंडोरी, पिंपळगाव बसवंत, ओझर, वावी आणि लासलगाव पोलीस ठाण्यांतील एकूण दहा चेन स्नॅचिंगचे गुन्हे उघडकीस आले आहेत. आरोपींवर यापूर्वी जबरी चोरी, घरफोडी, चोरी, प्राणघातक हल्ला, खंडणी, दुखापत व फसवणूक यांसारखे गंभीर गुन्हे दाखल असल्याचे तपासात समोर आले आहे. तसेच विशाल सांगळे हा सातपूर पोलीस ठाण्यातील एका गंभीर गुन्ह्यात फरार असल्याचेही निष्पन्न झाले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या या कारवाईमुळे जिल्ह्यातील चेन स्नॅचिंगच्या घटनांवर आळा बसण्यास मदत होणार असून, आरोपींकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

# रिपब्लिकन पक्षाचे पाच हजार क्रियाशील सदस्य करण्याचा रिपाइं श्रमिक ब्रिगेडचा संकल्प



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : : रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पक्षाचे पाच हजार क्रियाशील सदस्य करण्याचा संकल्प , पुणे येथील रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडच्या राज्यस्तरीय मिटिंगमध्ये घेण्यात आला.

त्याच बरोबर पुणे येथे लवकरच राज्यस्तरीय श्रमिक हक्क परिषदेचे आयोजन करण्यात येईल अशी माहिती रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश अध्यक्ष डॉ सतीश केदारी यांनी पुणे येथील राज्यस्तरीय मिटींगमध्ये बोलताना दिली, आठवले यांच्या नेतृत्वाखाली पाच हजार क्रियाशील सदस्य करण्याचे आवाहन रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश अध्यक्ष डॉ सतीश केदारी यांनी पदाधिकाऱ्यांना केले.

रविवार दि. २८ जून २०२६ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन पुणे येथे , रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडची राज्यस्तरीय मिटींग घेण्यात आली यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना डॉ सतीश केदारी यांनी आवाहन केले.

यावेळी वरिष्ठ प्रदेश सरचिटणीस संदीपान साबळे, विष्णूदादा भोसले, संतोषनाना डोळस, रवींद्र वालदे किशोर पंडागळे निलेश आगळे, गोविंद जगताप, तुषार कांबळे, स्टीवन जोसेफ मंगेश सोनवणे, अमोल खंडागळे शकुरभाई शेख, सत्तारभाई शेख सोनीताई जाधव,, पुरुषोत्तम पवार, नामदेव नेटके, सुधीर शेलार, काळूराम कांबळे, विशाल कांबळे, काळूराम शिंदे, सचिन शिंदे, अजय शिंदे, बाळासाहेब कांबळे, भाऊसाहेब कांबळे, सुदाम शेंडगे, अमोल शेलार, रवी तांबारे, प्रमोद कांबळे, अविनाश निकाळजे, दादू साळूंके, ज्ञानेश्वर खुडे, रवी पवार, नवनाथ लोखंडे, सारीका गायकवाड, सुरेश उकिरंडे, विलास पाटोळे, दत्ता सोनवणे, चेतन धोत्रे, सन्नी काळे, वेणिला पवार, ईश्वर शिंदे, छाया शिंदे, जानू काळे, संजय भालेराव, कांचन कांबळे, कॉमेश काळे ,विलास धुमाळ, सुमित गायकवाड सिध्देश्वर ठाणांबीर, राजकुमार सोनवणे, विराज काळे, उमेश काळे, दिपाली काळे, सुनिल वाघमारे, यांसह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ सतीश केदारी म्हणाले की, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री नामदार रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेड, सोशीत वंचित घटकांचे प्रश्न प्रभावीपणे सोडविण्यासाठी काम करीत आहे, त्यामुळे अधिक ताकदीने काम करता यावे यासाठी किमान पाच हजार क्रियाशील सदस्य करण्याचा संकल्प आज आपण सर्वांनी मिळून करु, असे ही केदारी म्हणाले.

यावेळी रामदास आठवले यांच्या उपस्थितीत भव्य श्रमिक हक्क परिषद घेण्याचा निर्णय सर्व संमतीने घेण्यात आला.

नवीन पदाधिकारी निवडीसाठी, डॉ, सतीश केदारी, संदीपान साबळे, कुमार ढवळे, विष्णूदादा भोसले, निलेश आगळे, गोविंद जगताप, तुषार कांबळे यांची कोअर कमिटी स्थापन करण्यात आली, ५ जुलै २०२६ पर्यंत क्रियाशील सभासद नोंदणी करणे, व १९ जूलै २०२६ रोजी , पुणे येथे जाहीर मेळावा घेऊन , रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांची राज्य जिल्हा तालुका शहर व विभागीय कार्यकारणीवर नियुक्ती करण्याचा निर्णय सर्वांनी घेतला, यावेळी संदीपान साबळे विष्णूदादा भोसले संतोषनाना डोळस, यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले, मिटींगचे आयोजन किशोर पंडागळे व निलेश आगळे यांनी केले होते.

# गुरुवारपासून मंगरूळ पान येथे हजरत सय्यद दाऊद जलाल बुखारी उर्फ श्री शेख बाबा यांच्या उर्सास प्रारंभ


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पानमंगरूळ/प्रतिनिधी : पान मंगरूळ चे ग्रामदैवत हजरत सय्यद दाऊद जलाल बुखारी (रहे.) उर्फ श्री शेख बाबा यांच्या पवित्र उर्सानिमित्त मंगरूळ पान येथे २ जुलै ते ४ जुलै २०२६ या कालावधीत विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. उर्स सोहळ्यानिमित्त भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

गुरुवार दि. २ जुलै रोजी : उर्साच्या पहिल्या दिवशी धार्मिक कार्यक्रम, सायं. ७ वाजता महादेव कोळी समाजाचे नैवेद्य, रात्री आठ वाजता पोलीस पाटील यांची किस्ती, रात्री नऊ वाजता देवीकवठे ग्रामस्थ व मानकऱ्यांकडून कडून तेल अर्पण, रात्री दहा वाजता भाविकांकडून पहिला चिराग लावण्यात येईल.

शुक्रवार दि. ३ जुलै रोजी दुसऱ्या दिवशी कुरआन पठण, भाविकांकडून किस्ती कंदुरी चे कार्यक्रम दिवसभर सुरु, दुपारी १२ वाजल्यापासून कलगी तुरईचे गाणे रात्री आठ वाजता कव्वाली, धार्मिक कार्यक्रम व दिवसभर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. रात्री दहा वाजता भाविकांकडून दुसरा चिराग लावण्यात येईल.

शनिवार दि. ४ रोजी तिसऱ्या दिवशी उर्साची सांगता, सकाळी नऊ वाजता कुराण पठण, जियारात, प्रसाद वाटप, दुपारी १२ वाजल्यापासून कलगी तुरईचे गाणे विविध धार्मिक कार्यक्रमांनी होणार असून भाविकांसाठी विशेष दुआ व आशीर्वादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. रात्री दहा वाजता भाविकांकडून तिसरा चिराग लावण्यात येईल.



याशिवाय उर्सानिमित्त भव्य यात्रा व मनोरंजन मेळ्याचे आयोजन करण्यात आले असून विविध खेळणी, खाद्यपदार्थांची दुकाने तसेच आकाशपाळणा आदी आकर्षणे यात्रेकरूंना अनुभवता येणार आहेत.

या उर्स सोहळ्याचे आयोजन हजरत सय्यद दाऊद जलाल बुखारी (कादरी) दर्गा ट्रस्ट कमिटी व शेख बाबा यात्रा कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

उर्स व यात्रेनिमित्त सर्व धर्मीय भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धार्मिक व सामाजिक ऐक्याचे दर्शन घडवावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## ॲड. पंडित राठोड यांची ग्रामविकास मंत्र्यांकडे थेट तक्रार; जांब येथील देयके जाणीवपूर्वक अडवल्याचा गंभीर आरोप

# आमदारांच्या सूचनेला केराची टोपली! आर्णीच्या गटविकास अधिकाऱ्यांवर निलंबनाची टांगती तलवार..!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आर्णी/प्रतिनिधी : आर्णी तालुक्यातील जांब येथील विकासकामांची देयके जाणीवपूर्वक अडवून ठेवणाऱ्या गटविकास अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारावर आता मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वरिष्ठ लोकप्रतिनिधींच्या सूचनांकडेही सोयीस्कररीत्या दुर्लक्ष करणाऱ्या गटविकास अधिकारी रमेश खारोडे यांची विभागीय चौकशी करून त्यांना तत्काळ निलंबित करण्यात यावे, अशी धडक मागणी ड. पंडित राठोड यांनी राज्याचे ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे यांच्याकडे एका लेखी तक्रारीद्वारे केली आहे.

**निधी उपलब्ध असूनही देयके प्रलंबित**

ग्रामविकास मंत्र्यांना दिलेल्या निवेदनानुसार, ८ एप्रिल २०२६ रोजीच स्थानिक विकास निधीची रक्कम जांब ग्रामपंचायतीच्या खात्यात जमा झाली आहे. मात्र, निधी उपलब्ध असूनही अद्याप देयके मंजूर करण्यात आलेली नाहीत. विशेषतः 'संत सेवालाल महाराज बंजारा/लमाण तांडा समृद्धी योजने'अंतर्गत जी विकासकामे पूर्ण झाली आहेत, त्यांचे एम.बी. (चशरीीशाशपीं इेज्ञ) आणि सी.सी. (उेाश्रिशींळेप उशीींळषळ-लरींश) हेतुपुरस्सर प्रलंबित ठेवण्यात आल्याचा अत्यंत गंभीर आरोप ड. राठोड यांनी केला आहे.

**राजकीय व जातीय आकसापोटी दुजाभाव**

ॲड. पंडित राठोड यांनी राज्यस्तरीय अशासकीय सदस्य या नात्याने स्वतः या विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी केली आहे. शासनाच्या निकषांनुसार ही सर्व कामे अत्यंत दर्जेदार झाली असल्याचा निर्वाळा त्यांनी दिला आहे. मात्र, इतर गावांमधील निकृष्ट दर्जाच्या कामांची देयके विनासायास मंजूर होत असताना, जांब येथील दर्जेदार कामांची देयके केवळ राजकीय आणि जातीय प्रेरित तक्रारींच्या आधारावर रोखली जात असल्याचा खळबळजनक दावा या तक्रारीत करण्यात आला आहे.

**आमदारांच्या दूरध्वनीकडेही दुर्लक्ष**

या प्रकरणातील सर्वांत धक्कादायक बाब म्हणजे, मा. धर्मगुरू आमदार बाबुसिंगजी महाराज यांनी स्वतः गटविकास अधिकारी रमेश खारोडे यांना तीन वेळा दूरध्वनीवरून यासंदर्भात सूचना दिल्या होत्या. मात्र, खारोडे यांनी या सूचनांना वाटाण्याच्या अक्षता लावत वरिष्ठ लोकप्रतिनिधींचा स्पष्ट अवमान केला आहे. अधिकाऱ्याच्या या अरेरावीच्या कार्यपद्धतीमुळे तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

**मंत्र्यांकडे करण्यात आलेल्या प्रमुख मागण्या:**

तात्काळ देयके मंजुरी: मौजा जांब येथील प्रलंबित एम.बी., सी.सी. आणि अडवून ठेवलेली सर्व देयके विनाविलंब काढण्यात यावीत.

विभागीय चौकशी व निलंबन: गटविकास अधिकारी रमेश खारोडे यांच्या संशयास्पद कार्यपद्धतीची सखोल विभागीय चौकशी करावी आणि दोषी आढळल्यास त्यांच्यावर थेट निलंबनाची कारवाई करावी.

तत्काळ बदली: मनमानी कारभार करणाऱ्या या अधिकाऱ्याची आर्णी येथून तत्काळ उचलबांगडी (बदली) करण्यात यावी.

ग्रामविकास मंत्री या गंभीर प्रकरणाची दखल घेत गटविकास अधिकाऱ्यांवर नेमकी काय कारवाई करणार, याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागून आहे.